# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १६९ वा बुधवार दि.१८ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## दोन्ही उपमुख्यमंत्री अधिवेशनातून गायब!



नागपूर : हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळाचा विस्तार करून महायुती सरकारने येत्या दोन दिवसांत खाते वाटप जाहीर करण्यात येणार असल्याची घोषणा केली होती. मात्र अद्यापही खाते वाटपाचे काहीच ठरल्याचे दिसत नाही. मंत्रिमंडळात समावेश नसल्याने अनेक ज्येष्ठ नेते व आमदार नाराज आहेत. यातच एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनाला दांडी मारली आहे.

मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटपावरून नाराजी असल्याने दोन्ही उपमुख्यमंत्री तातडीने दिल्लीला गेले असल्याची चर्चा नागपुरात आहे. मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर एकनाथ शिंदे यांनी आम्ही कोणीच नाराज नाही, सर्वकाही सुरळीत सुरू असल्याचा दावा केला होता. ज्या प्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला अडीच वर्षे साथ दिली त्याच प्रमाणे आपणही त्यांच्यासोबत भक्कम उभे राहणार असल्याचेही जाहीर केले होते.

अजित पवार यांनी आपल्या नेत्यांची नाराजी दूर करण्यासाठी अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला जाहीर केला. देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांच्या कामांचे ऑडिट करून फेरबदल केला जाईल, असे सांगितले. हे सर्व सोपस्कार पाडल्यानंतरही कोणाचीच नाराजी दूर झाल्याचे दिसत नाही, उलट वाढत चालली आहे. नाराज असलेले छगन भुजबळ अधिवेशनाला हजेरी लावून निघून गेले.

मुनगंटीवार दोन दिवसांपासून अधिवेशनात फिरकले नाही. तानाजी सावंतही रुसले आहेत. भंडाराचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी शिवसेनेच्या उपनेतेपद आणि विदर्भाचे समन्वयक पदाचा राजीनामा दिला आहे. अधिवेशनात उत्तर द्यायला संबंधित खात्याचे मंत्री नसताना आज दोन्ही उपमुख्यमंत्री कामकाजात उपस्थित नव्हते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकट्याने विरोधकांचा हल्ला परतवला.

फडणवीस हे सुमारे तासभर विधानसभेत बसून होते. त्यामुळे दोन्ही उपमुख्यमंत्री गेले कुठे, याचीच चर्चा सध्या रंगली आहे. अजित पवार आणि शिवसेनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी ते दिल्लीला गेले असल्याचे सांगितले. खातेवाटपावरून ते नाराज आहेत. ते या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असल्याचे समजते. त्यानंतरच खातेवाटप जाहीर केले जाईल, असे सांगण्यात येत आहे.

## भास्कर जाधव-विखे पाटील यांच्यात विधानसभेत खडाजंगी



नागपूर : वृत्तसंस्था राज्यपालांच्या अभिभाषणावरिल चर्चेवेळी विधानसभेत विरोधक आणि सत्ताधारी यांच्यात चांगलीच खडाजंगी झाली. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी थेट राज्यपालांनाच लक्ष्य करत काही प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या बोलण्यावर भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी आक्षेप घेतला.

भास्कर जाधव यांनी राज्यपालांवर हेत्वारोप केले आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे कामकाजातून काढून टाकावे असे भातखळकर म्हणाले. त्याच वेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी हस्तक्षेप करत विरोधक पराभवामुळे वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्यामुळे ते अशी वक्तव्य करत आहेत असे म्हटले. त्यानंतर जाधव आणि विखे यांच्यात शाब्दीक युद्ध रंगले. शेवटी तालिका अध्यक्षांना यात हस्तक्षेप केला. भास्कर जाधव यांनी भाषणाच्या सुरूवातीपासून आपला रोख राज्यपालांवर ठेवला होता. राज्यपालांच्या अभिभाषणात राज्यपाल हे जवळपास ६० वेळा माझं सरकार, माझं सरकार असं बोलले. पण हे तुमचं सरकार कसं झालं असा प्रश्न जाधव यांनी उपस्थित केला. नव्या सरकार स्थापनेवेळी राज्यपालांनी स्वत:हून मोठ्या पक्षाला सरकार स्थापनेसाठी का निमंत्रित केलं नाही असा प्रश्नही त्यांनी केला. शिवाय शपथविधीची अधिसुचनाही काढली गेली नव्हती, असं ते म्हणाले. त्यामुळे राज्यपालांना गृहीत धरलं गेलं होतं का? अशी विचारणाही त्यांनी केली.

दरम्यान, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे तालिका अध्यक्षांच्या मदतीला धावून आले. भास्कर जाधव हे जेष्ठ सदस्य आहेत. त्यांच्याकडून अशा पद्धतीची भाषा वापरणे योग्य नाही. त्यांचा जो काही पराभव झाला आहे, त्यामुळे विरोधक वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्यामुळे ते अशा पद्धतीचे वक्तव्य करत आहेत. यावर अध्यक्षांनीही आपण त्यांचे वक्तव्य तपासून योग्य तो निर्णय घेवू असे सांगितले. पण अध्यक्षांनी एकदा निर्णय दिला तर त्यावर चर्चा होत नाही. त्यामुळे त्यांचे वक्तव्य काढून टाकण्यात यावे असे राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

## लातूरसह राज्यातील कोलमडलेली स्वस्त धान्य यंत्रणा सुरळीत करा मा. आमदार धिरज देशमुख यांची राज्य सरकारकडे मागणी : ई-पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये १५ दिवसांपासून तांत्रिक बिघाड



लातूर / प्रतिनिधी :- लातूर ग्रामीण सह लातूर जिल्ह्यातील आणि राज्यातील अनेक भागात स्वस्त धान्य दुकानातील ई-पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने धान्य वितरण व्यवस्था पूर्णतः कोलमडली आहे. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने या प्रश्नात लक्ष घालून धान्य वितरण यंत्रणा सुरळीत करावी, अशी मागणी मा. आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी केली.

गेल्या महिनाभरापासून स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झालेला आहे. त्यामुळे धान्य असूनही त्याचे वितरण करता येत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. याचा प्रचंड मनस्ताप लातूर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. याबाबत लातूर ग्रामीण मधून सर्वसामान्यांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर मा. आमदार, काँग्रेसचे सरचिटणीस श्री धिरज विलासराव देशमुख यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे या विषयाकडे लक्ष वेधले. लातूर ग्रामीण मधील रेणापूर, लातूर, औसा तालुक्यातील गावातून स्वस्त धान्य दुकानातील ई- पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याच्या तक्रारी येत आहेत. लातूर जिल्ह्यात आणि राज्यात गेल्या दोन - तीन आठवड्यापासून स्वस्त धान्य दुकानातील ई पॉस मशीनच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाला असल्याने धान्य वितरण ठप्प असल्याचे स्पष्टीकरण येथील शासकीय अधिकारी देत आहेत. त्यामुळे राज्यातील असंख्य नागरिक स्वस्त आणि मोफत धान्यांच्या प्रतीक्षेत असल्याने दिसत आहे. राज्य शासनाने तातडीने या प्रकरणात लक्ष घालून लातूर ग्रामीण आणि राज्यातील सर्व ठिकाणची धान्य वितरण यंत्रणा सुरळीत करून सामान्यांच्या दिलासा द्यावा अशी मागणी मा. आमदार, काँग्रेसचे सरचिटणीस धिरज विलासराव देशमुख यांनी राज्य सरकारकडे केली.

## घाटनांदूर येथे रेल्वे गाड्या थांबवा खा.बजरंग सोनवणेंनी दिले रेल्वे बोर्ड अध्यक्षांना निवेदन

**घाटनंदूर येथे रेल्वे स्थानकावर या गाड्या थांबविण्याची मागणी**

घाटनांदूर रेल्वे स्थानक येथे औरंगाबाद-गुंटूरः ट्रेन क्र. १७२५४, गुंटूर - औरंगाबादः ट्रेन क्र. १७२५३,बंगलोर - नांदेडः ट्रेन क्र. १६५९३, नांदेड - बंगलोरः ट्रेन क्र. १६५९४, नांदेड - पनवेलः ट्रेन क्र. १७६१४, पनवेल - नांदेडः ट्रेन क्र. १७६१३ या रेल्वे थांबविण्यात याव्यात अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

केज/प्रतिनिधी जिल्ह्यातील घाटनांदूर रेल्वे स्थानक, सामान्य प्रवाशी आणि मालवाहतूक करण्यासाठी महत्वाचे स्थानक आहे. परंतू या रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून रेल्वे गाड्या थांबविणे बंद झाले आहे.परिणामी घाटनांदूर भागातील नागरिकांना रेल्वे स्थानक असताना देखील फायदा होत नाही.त्यामुळे घाटनांदूर मार्गावरुन धावणाऱ्या रेल्वे थांबविण्यात याव्यात, आशा मागणीचे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे बोर्डाचे केंद्रीय अध्यक्ष सतीश कुमार, रेल्वेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्ली येथे भेट घेवून सोमवार दिनांक १६ रोजी दिले आहे. त्यामुळे घाटनांदूर परिसरातील जनतेची अडचण दूर होणार आहे.



अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील रेल्वे स्थानक सार्वजनिक वाहतूकीसाठी परळी ते लातूर दरम्यान महत्वाचे स्थानक आहे. कोविड-१९ महामारीपूर्वी औरंगाबाद-गुंटूर आणि नांदेड-बंगलोर गाड्या नियमितपणे घाटनंदूर येथे थांबत होत्या. परंतु नंतर थांबणे थांबवले गेले. घाटनंदूर आणि त्या परिसरातील नागरिकांसाठी असुविधाजनक आहे.त्यामुळे या ठिकाणी रेल्वे गाड्या थांबविण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे केली.

## आंतरराज्य टोळीतील अट्टल आरोपीताकडून ३० तोळे वजनाचे ०९ लाख रुपयाचे सोन्याचे दागिने हस्तगत.

### स्थानिक गुन्हे शाखेची धाडशी कारवाई..



लातूर:- आंतरराज्य टोळीतील अट्टल आरोपीताकडून ३० तोळे वजनाचे ०९ लाख रुपयाचे सोन्याचे दागिने हस्तगत.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीमधून एका साखरपुड्याच्या कार्यक्रमात मधून काही अज्ञात आरोपींनी नजर चुकवून दागिन्याने भरलेली बॅग चोरून नेली होती. त्यावरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अज्ञात आरोपी विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी सदरचा चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्याकरिता आदेशित केले होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अधिकारी/अमलदारांचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामार्फत जिल्ह्यातील व जिल्हाबाहेरील तसेच परराज्यातील विविध गुन्हेगारांची माहिती एकत्र करून त्याचे विश्लेषण करण्यात येत होते.

सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक रात्र- दिवस परिश्रम घेत होते. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येत होती.

दरम्यान ०८/१२/२०२४ विशेष पोलीस पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, सदर कार्यक्रमांमध्ये दागिने चोरणारे आरोपी हे मध्यप्रदेश मधील राजगड जिल्ह्यातील बोडा गावातील आहेत. गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे सदर माहितीची शहनिशा करून करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून वरिष्ठांच्या मार्गदर्शनात व सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व आमलदाराचे एक पथक मध्यप्रदेशात रवाना करण्यात आले.

सदर पथकाने लातूर पासून दोन हजार किलोमीटर दूर जाऊन मध्यप्रदेश मध्ये तब्बल आठ दिवस अहोरात्र तापास करून नमूद गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेतला तसेच त्यांनी चोरलेल्या मुद्देमाला बाबत अचूक व सखोल माहिती मिळवली त्या आधारे नमूद आरोपी नामे

सोनू गोकुळप्रसाद सिसोदिया, वय अंदाजे २० वर्ष, राहणार हुलखेडी, तालुका पाचोर, जिल्हा राजगड, राज्य मध्य प्रदेश,

मेहताब नथूसिंग सिसोदिया, वय अंदाजे २५ वर्षे, राहणार कडिया, तालुका पाचोर जिल्हा राजगड मध्यप्रदेश,

कालू बनवारी सिसोदिया, अंदाजे वय २० वर्ष, राहणार कडिया तालुका पाचोरा जिल्हा राजगड जिल्हा मध्यप्रदेश.

अशांनी मिळून लातूर येथील छत्रपती चौकामधील एका हॉटेलमधील हॉलमध्ये साखरपुड्याच्या कार्यक्रमा मधून ३० तोळे सोन्याची बॅग चोरून ती एका महिला नातेवाईकाकडे लपवून ठेवल्याचे समजले. त्यावरून सदर पथकाने अतिशय कुशलतेने तपास करून नमूद महीलेकडून आरोपींनी चोरलेले ३० तोळ्याचे दागिने किंमत नऊ लाख रुपये जप्त केली आहे.

लातूर येथील पोलीस पथक गावामध्ये दाखल झाल्याची माहिती मिळताच नमूद आरोपी फरार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. तसेच गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे एमआयडीसी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसीचे पोलीस उपनिरीक्षक राजपूत हे करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक, विश्वंभर पल्लेवाड, पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, खुर्रम काझी, युवराज गिरी, मुन्ना मदने, विकास नळेगावकर, राजेश कंचे, मोहन सुरवसे, सायबर सेल चे पोलिस उपनिरीक्षक हीना शेख, पोलीस अमलदार संतोष देवडे, गणेश साठे, शैलेश सुळे यांनी केली आहे.

## सावरगाव तांडा येथे इसमाचा खून



किनवट/शेख शौकत :-दगडाने ठेचून एका इसमाचा अज्ञात आरोपींनी खून केल्याची घटना सावरगाव तांडा दि. १६ रोजी सकाळी उघडकीस आली आहे. या प्रकरणातील आरोपींचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे. तालुक्यातील सावरगाव तांडा येथील सखाराम मारोती गायकवाड वय ४० यांचा गावाच्या जवळ असलेल्या मोकळ्या जागेत दि. १५ डिसेंबर रोजी रात्री अज्ञात आरोपींनी दगडाने ठेचून खून केला. ही घटना दुसऱ्या दिवशी दि. १६ डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. तेव्हा गावात एकच खळबळ उडाली. इस्लापूर पोलिस स्टेशनला माहीती समजताच किनवटचे उप. विभागिय पोलिस अधिकारी मळघने व स. पोलिस निरीक्षक उमेश भोसले यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी घटनेची माहिती घेतली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया इस्लापूर पोलिस स्टेशनमध्ये सुरू होती. या इसमाचा खून कोणी केला, कोणत्या कारणामुळे करण्यात आला. याचा शोध पोलिस घेत आहेत. या घटनेमुळे सावरगाव तांडा व परिसरातील गावांमध्ये खळबळ उडाली आहे.

## संपादकीय....

### निवृत्तीवेतन; एक आधार

१७ डिसेंबर हा दिवस दरवर्षी विविध सेवानिवृत्त संघटना 'पेन्शनर्स डे' म्हणून साजरा करतात. त्यानिमित्ताने सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचा घेतलेला एक आढावा.

निवृत्तिवेतन हा शासकीय कर्मचार्यांना निवृत्तीनंतर मिळालेला जणू आधार आहे असे म्हणणे उचित ठरेल. केंद्र, राज्य सेवा आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या सर्व पेन्शनधारकांसाठी १७ डिसेंबर हा दिवस महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयात १७ डिसेंबर १९८३ रोजी सुनावणी करताना सरन्यायाधीशांनी ठामपणे सांगितले की, पेन्शन हे सरकारी बक्षीस नसून तो सर्व कर्मचार्यांचा हक्क आहे. निवृत्तीच्या तारखेच्या आधारावर निवृत्तिवेतनाचे फायदे वाढवण्यात कोणताही भेदभाव केला जाऊ शकत नाही. पेन्शनधारकांचे अधीक्षण पत्र म्हणूनही हा निर्णय मानला जातो. यामुळे १७ डिसेंबर हा दिवस १९८३ पासून 'पेन्शनर्स डे' म्हणून साजरा केला जातो.

आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या एकूण १२ टक्के निवृत्तिवेतनधारक आज निवृत्तिवेतन घेत आहेत. एकंदर निवृत्तिवेतनाचे नियत वयोमान निवृत्तिवेतन, पूर्ण सेवा निवृत्तिवेतन, रुग्णता निवृत्तिवेतन, भरपाई निवृत्तिवेतन, रजा निवृत्तिवेतन, अनुकंपा निवृत्तिवेतन, कुटुंब निवृत्तिवेतन, असाधारण निवृत्तिवेतन असे प्रकार असून या व्यतिरिक्त केंद्र व राज्य सरकारची श्रावणबाळ राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना व संजय गांधी निराधार निवृत्तिवेतन योजना याद्वारे दरमहा निवृत्तिवेतन देण्याची तरतूद शासनामार्फत केली जाते. याचप्रमाणे इतर खासगी कंपन्याही आपल्या कर्मचार्यांना दरमहा निवृत्तिवेतन देतात.

मध्यंतरी महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्यसैनिकांच्या व स्वातंत्र्यसैनिक कुटुंब निवृत्तिवेतनात स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त वाढ करून भारतीय स्वातंत्र्य संग्रामात योगदान दिलेल्या व्यक्तींचा एकप्रकारे सन्मान केला. आज अनेक घरात किमान २ ते ३ निवृत्तिवेतनधारक किंवा १-२ कुटुंबनिवृत्तिवेतन धारक आहेत. समजा, एका घरात पती-पत्नी हे दोघेही निवृत्तिवेतन धारक आहेत. त्यांच्यापैकी पत्नीचे निधन झाले तर त्या पतीला त्यांच्या स्वत:च्या निवृत्तिवेतनासह पत्नीचे अर्धे निवृत्तिवेतन मिळते. किंवा जर पती निधन पावला तर पत्नीला पतीचे अर्धे निवृत्तिवेतन व स्वतःचे पूर्ण वेतन मिळते. तसेच रेल्वे व डिफेन्सच्या निवृत्तिवेतन धारकांना पती-पत्नी व त्यांच्यानंतर विधवा, घटस्फोटित मुलगी यांना निवृत्तिवेतन मिळते.

खासदार, आमदार व मंत्री यांना त्यांचा कार्यकाळ संपल्यावर निवृत्तिवेतन चालू होते. याची खरंच आवश्यकता आहे का? तसेच त्यांना निवृत्तिवेतनाच्या वार्षिक उत्पन्नात आयकरात सवलत दिली जाते व इतर निवृत्तिवेतन धारकांना आयकरात निवृत्तिवेतनात सवलत दिली जात नाही.हा एक प्रकारे निवृत्तिवेतन धारकांवर झालेला अन्याय आहे. तसेच भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केलेल्या व्यक्तीला ५० हजार रुपये मासिक पेन्शन देण्याची तरतूद केंद्र शासनाने केली आहे व त्या व्यक्तीच्या पश्चात पत्नीला अर्धी पेन्शन दिली जाते. ही पेन्शन देणे खरंच गरजेचे आहे का? अशाने सरकारी तिजोरीवर भार पडत नाही का? मध्यंतरी महाराष्ट्र शासनाने जुन्या पेन्शनऐवजी नवीन पेन्शन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी अधिवेशनात चर्चा केली, पण तो प्रश्न अजूनही भिजत पडला आहे.

वास्तविक आयुष्यातील ३०-३५ वर्षे नोकरी करून नव्या पेन्शन योजनेप्रमाणे कमी पेन्शन मिळणार असेल तर त्या पेन्शनचा उपयोग काय? १० ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्याचा शासन निर्णय प्रसिद्ध झाला असून, हा निर्णय ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक निवृत्तिवेतन धारकांना मनस्ताप देणारा आहे. या निर्णयात असे नमूद केले आहे की वयाच्या पुराव्याबाबत ८० वर्षांवरील निवृत्तिवेतन धारकांचे आधारकार्ड व पॅन कार्ड वयाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरू नये व त्याऐवजी त्या व्यक्तींचा जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, पासपोर्ट किंवा इतर शासकीय पुरावा किंवा ज्या बँकेत निवृत्तिवेतन जमा होते त्या शाखेच्या व्यवस्थापकाचे जन्मतारीख व वयाबाबतचे पत्र असे पुरावे ग्राह्य धरावे. आता ८० वर्षांवरील काही मोजल्या व्यक्ती सोडल्या तर त्यांच्याकडे जन्माचा व शाळेचा दाखला असणे शक्य नाही. तसेच ज्यांचा जन्म ग्रामीण भागात घरी झाला असेल व त्यांचे शिक्षण कमी असेल तर ते लोक काय करणार? याबाबत पुन्हा एकदा शासनाने विचार करणे गरजेचे आहे.

१० नोव्हेंबर २०१४ पासून केंद्र सरकारच्या आदेशानुसार, सर्व निवृत्तिवेतन धारकांना दरवर्षी जीवन प्रमाणपत्र किंवा हयातीचा दाखला द्यावा लागतो. यासाठी ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक निवृत्तिवेतन धारकांना ते निवृत्तिवेतन घेत असलेल्या बँकेत बायोमेट्रिक्स पद्धतीने हयातीचा दाखला द्यावा लागतो. यात काही जणांच्या अंगठ्याचे ठसे बरोबर न उमटल्याने त्यांचा हयातीचा दाखला जमा होत नाही. तसेच डिफेन्सच्या निवृत्तिवेतन धारकांच्यासाठी स्पर्श या वेबपोर्टलवर त्यांना हयातीचा दाखला जमा करावा लागतो. अनेकदा ते पोर्टल बंद होते किंवा नेटमुळे स्लो चालते. त्यामुळे त्यातील काही निवृत्तिवेतन धारक त्यांचा हयातीचा दाखला जमा करू शकत नाही.

याबाबत त्यांनी दुसरा पर्याय म्हणून जीवन प्रमाण पत्राचे फॉर्म उपलब्ध करावे जेणेकरून ज्यांचे स्पर्श पोर्टलद्वारे किंवा बायोमेट्रिक्सद्वारे जीवनप्रमाणपत्र जमा होत नाही त्यांना ते सोयीचे जाईल. निवृत्तिवेतन अंशराशीकरणाचे पुनर्स्थापना कालावधी १५ वर्षे ऐवजी १२ वर्षे करण्यासाठी अनेक सेवानिवृत्त संघटना आग्रही असून, त्यांचा शासनाशी पत्रव्यवहार सुरू आहे. पण अद्याप हा प्रश्न सरकारने प्रलंबित ठेवला आहे.

निवृत्तिवेतन धारकांच्या काही प्रमुख मागण्या- १. केंद्रीय निवृत्तिवेतनाप्रमाणे दरमहा रु. १०००/- वैद्यकीय भत्ता मिळावा. २. ईपीएफओच्या निवृत्त कर्मचार्यांना किमान रु. ७५००/- निवृत्तिवेतन मिळावे. ३. जुनी पेन्शन योजना अमलात आणावी. ४. पेन्शन अदालत किमान वर्षातून २ वेळा घ्यावी. ५. बँकेत किंवा पोष्टात निवृत्तीवेतन धारकांसाठी स्वतंत्र काउंटर असावा.

# अद्वितीय उस्ताद

तबला या वाद्यसंगीतातील महत्त्वाच्या वाद्याला जगभरात प्रसिद्धी, लोकप्रियता आणि सन्मान मिळवून देण्याचं अद्वितीय कार्य करणार्या उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन झालं. नियतीनं एक महान तबलावादक आपल्यातून हिरावून नेला.



वाद्यसंगीतातील तबला या वाद्याला वैश्विक पटलावर लोकप्रियता, सन्मान, प्रसिद्धी मिळवून देण्याचे अद्वितीय कार्य करणार्या उस्ताद झाकीर हुसेन यांच्या जाण्याचं वृत्त दुर्दैवानं खरं ठरलं आणि नियतीनं एक महान तबलावादक आपल्यापासून हिरावून नेला. सत्तरीनंतरच्या काळात संगीतक्षेत्रात, कलाक्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात अशी काही व्यक्तिमत्त्व पाहायला मिळाली जी त्या क्षेत्राला समानार्थी शब्द बनून गेली. उदाहरणार्थ, त्या काळात क्रिकेट म्हटलं की गावसकर-कपिल देव असं समीकरण होतं. तशाच प्रकारे संगीत ऐकणार्यांमध्ये, तबलाप्रेमींमध्ये किंवा अगदी सर्वसामान्य माणसांमध्ये तबला या वाद्याला समानार्थी शब्द हा उस्ताद झाकीर हुसेन हा झाला. त्यांनी तबला या वाद्याला केवळ ओळख मिळवून दिली नाही तर त्याच्या नादातली, तालातली जादूही अनुभवण्यास दिली. सामान्य माणसापर्यंत एखादं वाद्य कसं पोहोचतं याचं हे अद्वितीय उदाहरण म्हणावं लागेल. तबला हे साथीचं वाद्य न राहता त्याला स्टेजवरील मधली जागा मिळणं हे सौभाग्य त्यांच्यामुळे लाभलं.

भारतामध्ये तबलावादकाला ग्लॅमर मिळण्याची प्रक्रियाच मुळी उस्ताद झाकीर हुसेन यांच्यापासून सुरू झाली आणि ही खूप महत्त्वाची बाब आहे, असं मला वाटतं. झाकीरभाईंना तबलावादनाचे संस्कार कुटुंबातूनच झाले. वयाच्या अवघ्या तिसर्या वर्षी उस्ताद अल्लारखा खान यांच्याकडून ते पखवाज वाजवायला शिकले. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांनी अमेरिकेत पहिला कॉन्सर्ट केला होता. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी ऑल-स्टार जागतिक मैङ्गलीत भाग घेण्यासाठी व्हाइट हाउसमध्ये आमंत्रित केलेले ते पहिले भारतीय संगीतकार होते.

उस्तादजींचं आणखी एक महत्त्वाचं योगदान म्हणजे, आंतरराष्ट्रीय स्तरावर तबला हा केवळ शास्त्रीय संगीतामधलं किंवा सिनेसंगीतामधलं एक वाद्य म्हणून पाहिला जात होता. पण एका इंटरनॅशनल कोलॅबरेशनमध्ये तबला हे वाद्य आणि तबला व ड्रम्स यांसारखी इतर वाद्यं एकत्र वाजणं आणि त्याला ग्रॅमीसारखे नामांकित अ‍ॅवार्डस् मिळणं यातून जगभरात तबल्याचा नाद प्रस्थापित होणं, त्याला वैश्विक दर्जा मिळणं हे उस्तादजींमुळे शक्य होऊ शकलं. सातासमुद्रापार जगभरातल्या लोकांच्या कानात तबल्याचा ध्वनी प्रस्थापित करण्यामध्ये उस्तादजींचा सगळ्यात महत्त्वाचा वाटा आहे. अन्यथा, आंतराष्ट्रीय पातळीवर तबला हा केवळ क्लासिकल म्युझिकमधलं वाद्य म्हणूनच ओळखला गेला असता. पण आज तशी स्थिती नाहीये. परदेशी संगीतांमध्येही तबल्याचा वापर केला जातो आणि विदेशातील अनेक जण तबला तन्मयतेनं शिकताना, वाजवताना आणि ऐकताना दिसतात. जसं पंडित रविशंकर यांनी सतारवादनाला वैश्विक ओळख मिळवून दिली तशाच प्रकारे झाकीरभाईंनी तबल्याला ओळख, प्रतिष्ठा मिळवून दिली.

माझ्या मते, शिव हरी यांनी ज्याप्रमाणे चित्रपट संगीताच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला तशाच प्रकारे झाकीरभाईंनीही पूर्णपणाने संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रावर ङ्गोकस केला असता तर ते संगीतकार म्हणूनही तितकेच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले असते. पण त्यांनी प्रामुख्यानं वाद्यसंगीत, फ्युजन याकडे अधिक लक्ष दिलं. त्याऐवजी शब्दप्रधान संगीताकडं लक्ष दिलं असतं तर ते उत्कृष्ट शब्दप्रधान गीतांच्या चालीही करू शकले असते. कारण उस्तादजींच्या संपूर्ण कुटुंबालाच काव्य, रचना, उपशास्त्रीय संगीताची उत्तम जाण होती. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, कलाकारानं कसं वागावं, कसं वावरावं आणि रंगमंचावरून कसं बोलावं याचा आदर्श झाकीरभाईंनी घालून दिला आणि मला वाटतं तो प्रत्येक कलाकारासाठी त्यांच्या पश्चातही खूप मोठी शिकवण म्हणून पाहिला गेला पाहिजे. मैङ्गिलींमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये केवळ गायक अथवा संगीतकाराचा परङ्गॉर्मन्स उत्तम असणं पुरेसं नाही. परङ्गॉर्मन्स व्यतिरिक्त कलाकार जे बोलतो, सहकलाकारांशी, इंजिनिअरशी, संयोजकांशी संवाद साधतो तो कसा असायला हवा याबाबत उस्ताद झाकीरहुसेन यांचे व्हिडिओ सर्वांसाठी मार्गदर्शक असतील. कारण, झाकीरभाई आणि त्यांचे वडील ज्यावेळी एकत्रित परङ्गॉर्मन्स करायचे, त्यावेळी ते ज्या अदबीनं बसायचे इथपासून ते मी माझ्या गुरूवर्यांसोबत वाजवतो आहे याचा उस्तादजींच्या वागण्या-बोलण्यामध्ये दिसणारा जाणीवभाव हा खरोखरीच एक संस्कार असायचा.

त्यांच्या कार्यक्रमांमध्ये 'मला तुम्ही ग्लॅमर देऊ नका, मी शिष्य आहे,' असं ते प्रेक्षकांना सांगताना मी ऐकलं आहे. अशा प्रकारचे संस्कार नकळतपणानं तुमच्या वागणुकीतून करत असता. ही संस्कारांची पेरणी अनेक वर्षांची तपश्चर्या, साधना आणि कमालीची नम्रता, कृतज्ञता या मूलतः अंगी असणार्या स्वभावगुणांमधून होत असते. अशा व्यक्तिमत्त्वाचं असणं हे सर्वांसाठी खूप महत्त्वाचं असतं. किंबहुना अशी माणसं आपल्या डोळ्यासमोरून कधीच हलू नयेत असं वाटत राहतं. त्यामुळेच त्यांना लाइव्ह कार्यक्रमांमध्ये ज्यांना पाहता आलं नाही, त्यांचं खरोखरीच खूप नुकसान झालं असं मला वाटतं. पण त्यांच्या मुलाखती, कार्यक्रमांचे व्हिडिओ यांमधून हे संस्कार सदैव होत राहतील. कला आणि विद्वत्तेबरोबरच वागण्याची पद्धतही आहे, असं ङ्गार कमी लोकांमध्ये आढळतं. पण अल्लारखासाहेब आणि झाकीरभाई, त्यांचे भाऊ तौङ्गिकजी हे दोघंही या तिन्ही गुणवैशिष्ट्यांच्या त्रिवेणी संगम होते. यामुळेच जेव्हा झाकीरभाईंच्या निधनाचं वृत्त समोर आलं तेव्हा अगदी शेवटपर्यंत प्रत्येकाच्या मनात येत होतं की ही अङ्गवा असावी. एखाद्याच्या मृत्यूची बातमी अङ्गवा असावी, असं वाटण्यासाठी लोकांमध्ये कासावीस असावी यावरून त्या व्यक्तिमत्त्वाची उंची किती मोठी होते हे लक्षात येतं. सुदैवानं, मी झाकीरभाईंचे अनेक कार्यक्रम प्रत्यक्ष पाहिले आहेत आणि त्यातून मंत्रमुग्ध होण्याची संधीही मला मिळाली. लहान असताना सवाई गंधर्व महोत्सवामध्ये जायचो तेव्हापासून त्यांच्या तबलावादनाचे अवीट ध्वनी माझ्या कानावर पडत आले आहेत. यामध्ये सोलो परङ्गॉर्मन्सही पाहिले आहेत आणि साथही पाहिली आहे. पण साथीच्या वेळी साथ आणि सोलोच्या वेळी सोलो हे झाकीरभाईंना अचूकरित्या जमत होतं. त्यांना शब्दांपासून सगळ्याचीच जाण असल्यामुळे ठुमरीला कशी साथ द्यायची, गझलला कशी साथ द्यायची आणि वाद्यसंगीताला कशी साथ द्यायची याची अचूक जाण त्यांना होती. यामुळे त्यांचं वाजवणं कधीच बोजड आणि तांत्रिक वाटलं नाही. अशा या महान तबलावादकाचा लाइव्ह परङ्गॉर्मन्स पाहण्याचा योग आता कधीच येणार नाही, याची सल मनाला सतत राहील आणि तालाचं हे आवर्तन समेवर येण्यापूर्वी असं का थांबलं, हा प्रश्न बोचत राहील.

# महायुतीची नवी टीम

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर सरकार स्थापनेची दीर्घकाळ रेंगाळलेली प्रक्रिया आता बर्याच अंशी पूर्ण झाली आहे. पहिल्यांदा मुख्यमंत्री पदावरून रंगलेले नाटक बरेच दिवस चालले. तो विषय रडतखडत हाता वेगळा केल्यानंतर मंत्रिपदांसाठी लॉबिंग सुरू झाले. काल नागपुरात त्यावरही तोडगा निघाला आणि ३९ जणांचा राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. हे ३९ चेहरे आणि मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री गृहीत धरता आता राज्य मंत्रिमंडळात केवळ एक मंत्रिपद रिक्त राहिले आहे. ते बहुदा भाजपच्याच हे खरे, पण ते आपापल्या पक्षात फार काही खळबळ वाजवण्याच्या मनः स्थितीत नाहीत किंबहुना त्यांची तेवढी आता ताकद उरलेली नाही असे स्पष्ट दिसते आहे. मंत्रिपदासाठी तीनही पक्षांमध्ये ज्या स्वरूपाचे लॉबिंग झाले होते ते पाहता ज्यांची मंत्रिमंडळात वर्णी लागलेली नाही त्यांच्याकडून भविष्यात काही आगळीक होऊ शकते याचा अंदाज बहुदा तिन्ही पक्षाच्या नेत्यांना आला असावा. म्हणून त्यावर तोडगा म्हणून ही मंत्रिपदे अडीच वर्षासाठीच दिली गेली आहेत, त्यानंतर पुन्हा त्यात फेरबदल होतील असे गाजर इच्छुकांना दाखवले गेले आहे. त्यामुळे आता पुण्याच्या रखडलेल्या विकासकामांना गती मिळायला हरकत नसावी. मंत्रिपदांचे वाटप झाले, मात्र अजून खातेवाटप बाकी आहे.

त्यातही अर्थ, गृह, महसूल आणि नगर विकास या महत्त्वाच्या खात्यांवरील तिन्ही पक्षांची दावेदारी पाहता आता यापुढील काही काळ त्या खात्यातील रस्सीखेचासाठी जाईल. त्यातूनही अनेक रुसवे-फुगवे पुढे येतील. प्रत्येक टप्प्यावर झालेले हे नाराजी नाट्य पाहता महायुतीची नवी टीम कितपत एकजिनसीपणाने काम करील याविषयीची साशंकता कायम राहणार आहे. अर्थात, हा सगळा घोळ दूर करून समर्थपणे



वाट्याचे असावे असे वाटते. मंत्रिमंडळामध्ये अशा दोन-तीन जागा रिकाम्या ठेवण्याची पूर्वीपासूनची पद्धत आहे. सगळे मंत्रिमंडळ पूर्ण क्षमतेने भरले, की मग इच्छुकांमध्ये नाराजी उफाळून वर येते. त्यांना गाजर दाखवून शांत ठेवण्यासाठी अशा दोन-चार जागा नेहमीच रिक्त ठेवल्या जातात.

पण या वेळेला मात्र एकच जागा रिकामी ठेवली गेली आहे आणि त्यातही ती महायुतीतील तीन पैकी कुठल्या पक्षाची आहे तेही जाहीर केले गेलेले नाही. त्यामुळे त्या एका जागेवर आपला कधी ना कधी नंबर लागेल असा तिन्ही पक्षातल्या इच्छुकांचा डोळा राहील व ते शांत राहतील अशी अटकळ यामागे असावी. या ३९ जणांमध्ये ३३ कॅबिनेट दर्जाचे मंत्री आणि सहा राज्यमंत्री आहेत. त्यापैकी निम्म्याहून अधिक नवे चेहरे आहेत. एकूण चार महिलांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे अशा स्वरूपाची ही महायुती सरकारची नवीन टीम आहे. नव्या जुन्यांचा संगम करून एक वेगळा पॅटर्न राबवण्याचा प्रयत्न महायुतीने केला असला, तरी ही रचना फार चमकदार आहे असे म्हणता येत नाही.

वळसे पाटील, मुनगंटीवार आणि भुजबळ अशा ज्येष्ठांना नारळ देण्यात आला आहे. हे मात्र त्यांच्या त्यांच्या पक्षाच्या नेतृत्वाने दाखवलेले एक धाडस म्हणावे लागेल. डावलले गेलेले हे तिघेही जण शक्तिशाली आहेत

अशी अडीच वर्षाची मर्यादा ठेवणे मंत्र्यांच्या दृष्टीने सोयीचे नाही. त्याचे कारण असे की आपण कितीही चांगले काम केले तरी आपल्याला अडीच वर्षानी जर डच्यूच मिळणार असेल तर मिळालेल्या संधीचा स्वतःच्या फायद्यासाठी अधिकाधिक लाभ करून घेण्याकडेच यातील मंत्र्यांचा कल असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मंत्रिपदे अडीच वर्षासाठीच आहेत असे सर्वच मंत्र्यांना सांगितले गेल्याने राज्याचे नुकसानच होऊ शकते. कारण मंत्रिमंडळामध्ये योग्य तो ताळमेळ किंवा टीमवर्क त्यातून कायम राखता येणे अवघड होऊन बसते. या मंत्रिमंडळ रचनेत अनेक जिल्ह्यांना मंत्रिपदापासून वंचित राहावे लागले आहे.

यात सोलापूर, नांदेड, धुळे, सांगली, लातूर, धाराशिव, जालना अशा काही महत्त्वाच्या जिल्ह्यांचा समावेश आहे. पुणे जिल्ह्याला जेमतेम चारच मंत्रिपदे मिळाली आहेत. त्यातील चंद्रकांत पाटील, दत्तात्रय भरणे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आधीचेच मंत्री पुन्हा रिपीट झाले आणि ते अपेक्षितच होते. पण पुण्याला माधुरी मिसाळ यांच्या रूपाने एक जादाचे राज्यमंत्रिपदही मिळाले. त्यामुळे पुणे शहराला राज्य मंत्रिमंडळात चंद्रकांत पाटील आणि माधुरी मिसाळ अशी दोन मंत्रिपदे आणि मुरलीधर मोहोळ यांच्या रूपाने एक केंद्रीय मंत्रिपद अशी एकूण तीन पदे मिळाली आहेत.

राज्यकारभार हाकायला एकट्या फडणवीस यांचे नेतृत्व पुरेसे आहे. पण त्या महत्त्वाकांक्षेला धक्का बसलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडून काही अडथळे येतील काय, हा धोका कायमच आहे. दृश्य स्वरूपात आता राज्य सरकारचा कारभार नव्या मंत्रिमंडळ रचनेने पूर्ववत सुरू होईल अशी अपेक्षा असली तरी त्यांच्यापुढे सगळ्यात मोठे आव्हान आश्वासन पूर्तीचे असेल.

राज्यावर सध्या आठ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा बोजा झाला आहे असे म्हणतात. त्यात आता निवडणूक पूर्वकाळात जाहीर झालेल्या योजना आणि आश्वासनांचा खर्च लक्षात घेतला तर आणखी एक लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा सरकारच्या तिजोरीवर पडणार आहे. लाडकी बहीण योजनेचा अतिरिक्त खर्च आणि शेतकर्यांना दाखवण्यात आलेले कर्जमाफीचे गाजर या दोन मोठ्या खर्चाच्या बाजू आहेत. महायुतीला राज्यातील तब्बल २३७ जागा मिळाल्या असल्याने लोकांकडून या सरकारविषयीच्या अपेक्षाही प्रचंड वाढल्या आहेत. जितक्या प्रचंड लोकप्रियतेच्या लाटेवर हे सरकार स्वार झाले, त्या तुलनेत लोकांची अपेक्षापूर्ती किती कार्यक्षमपणे आणि किती अवधीत पूर्ण करते यावर या सरकारचे यश अवलंबून असेल.


# वाढत्या थंडीत अशी घ्या काळजी !

राज्यात सध्या दिवसेंदिवस तापमानाचा पारा चांगलाच खाली येताना दिसत आहे. त्यामुळे राज्यात थंडी वाढली आहे. उत्तरेकडे थंड वाऱ्याचा जोर वाढल्याने राज्यात कडाक्याची थंडी पडली असून लातूर जिल्ह्यात देखील कडाक्याची थंडी अनुभवायला मिळत आहे. उत्तरेकडील वाढत्या शीत लहरींमुळे राज्यात पुढील काही दिवस कडाक्याची थंडी राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, थंडीची लाट किंवा शीत लहर ही एक हवामानीय घटना आहे. ज्यामुळे विशिष्ट क्षेत्रातील तापमान सरासरीपेक्षा खूप कमी होते. थंडीच्या लाटेमुळे उच्च वेगाच्या थंड वाऱ्यांचा अनुभव येतो. ज्यामुळे हवामान प्रत्यक्षात आहे. त्यापेक्षा जास्त थंड वाटते. ही घटना अचानक घडू शकते किंवा काही दिवसांपर्यंत टिकू शकते, ज्यामुळे मानवी जीवन, शेती, पशुधन वन्यजीव प्रभावित होण्याची शक्यता असते. वाढत्या शीत लहरीमुळे शरिराच्या तापमानावर विपरित परिणाम होतो. ज्यामुळे शारिरीक समस्या उद्भवू शकतात. विशेषत: आरोग्याच्या दृष्टिने अतिजोखीम घटक जसे की, गरोदर महिला, लहान बालके, वयोवृध्द नागरिक, श्वसनाच्या आजारांच्या व्यक्ती हे अधिक प्रभावित होण्याची शक्यता असते. या अनुषंगाने जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना त्यांच्या संबंधित कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याबाबत मार्गदर्शक सूचना जिल्हास्तरावरुन देण्यात आलेल्या असून वाढत्या थंडीपासून नागरिकांनी स्वत:चा बचाव करण्यासाठी, सुरक्षित राहण्यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे.

वाढत्या थंडीत – घ्यावयाची काळजी

पुरेसे थंडीचे कपडे बाळगा, एकावर एक असे अनेक कपडे घालणेही उपयुक्त ठरेल. कोरडे रहा,ओले असाल तर कपडे पटकन बदला. ज्याद्वारे शररिरातील उष्णता कमी होणार नाही. हातमोज्यांपेक्षा पूर्ण हात सलगपणे जाईल असे मोजे घ्या, त्याने जास्त जास्त गरम वाटून थंडीपासून बचाव होतो. थंडीची लाट आली असतांना शक्यतो घरातच थांबा.थंड वाऱ्यापासून बचावासाठी किमान प्रवास करा. घरातल्या वृध्दांची आणि लहान मुलांची काळजी घ्या. रेडिओ, टिव्ही, तसेच वृत्तपत्रातून हवामान विषयक ताज्या बातम्या मिळवा. नियमितपणे गरम पेय प्या. मद्यमान करु नका, त्यानं शरिराचं तापमान कमी होते. थंडीने शरिराचा भाग मऊ वा मलूल होणं, बोटांवर तसेच पायाच्या टोकाला, कानाच्या पाळीला आणि नाकाच्या शेंड्यावर निस्तेजपणा, पांढरटपणा किंवा पिवळेपणा जाणवणे यासारख्या लक्षणांकडे लक्ष द्या. थंडीचा चटका बसून भाजल्यासारखं झालं तर चोळू नका, त्यांने जास्तीच हानी होईल. थंडीचा चटका बसलेला शरिराचा भाग गरम पाण्यात म्हणजे सहन होईल इतपत गरम पाण्यात बुडवावा. थंडीने कापत असाल तर त्याकडे दुर्लक्ष करु नका . हे शरिराचे तापमान कमी होत असल्याचे पहिले लक्षण आहे आणि लगेचच घरात या. थेट शरिराशी संपर्क होईल अशा पध्दतीने थंडी कमी करा. त्यात घोंगड्याचा थर, कपडे, टॉवेल किंवा काहीही आच्छादनाचा थर वापरा. थंडीमुळे कोणत्याही प्रकारची आरोग्य समस्या उद्भवल्यास नजीकच्या शासकीय दवाखान्यात जावून तपासणी करा. अशा प्रकारे, वाढत्या थंडीत जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी स्वत:चा बचाव करण्यासाठी, सुरक्षित राहण्यासाठी याप्रमाणे आपली व आपल्या कुटूंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांनी केले आहे.

# उभे राहून पाणी पिणे योग्य की अयोग्य? वैज्ञनिकांचे 'हे' उत्तर वाचाच



पाणी आपल्या शरीरासाठी फार फायद्याचा असतो. पाणी हे जीवन आहे आणि पाण्याशिवाय जीवन नाही. असे आपण लहानपणापासूनच ऐकत आलो आहोत. या पृथ्वी तळावर असलेल्या प्रत्येक गोष्टीला शाबूत ठेवण्यासाठी पाण्याची गरज भासते. अगदी घरे बांधताना भिंती मजबूत करण्यासाठी पाणी फार महत्वाचा असतो. अगदी निर्जीव वस्तूंनाही टिकून राहण्यासाठी पाण्याचा आधार घ्यावा लागतो. पाणी हे जरी आपल्याला जिंवत ठेवण्याचे साधन असले तरी त्याच्या सेवनात काही तरी तथ्य असले पाहिजे. पाणी जीवन आहे म्हणून उगाच मर्यादेच्या बाहेर पिणे योग्य नाही. पाणी पिण्याचीही एक पद्धत असते. ती योग्य पद्धत पाळली गेली तर त्याचा फायदा आपल्या आरोग्यालाच होतो. अनेकदा आपण उभे राहून पाणी पिट असतो, तेच आपापल्या घरातील बुजुर्ग आपल्याला सांगतात कि पाणी उभे राहून नाही तर बसून प्यावे. ही गोष्ट सत्य आहे कि पाणी कधीही आरामात बसूनच प्यावे. याला अनेक धर्मात वेगवेगळे कारणे दिसून येतील, परंतु याला वैज्ञानिक कारणेही आहेत. आपल्या घरातील मंडळी आपल्या उभे राहून पाणी पिण्याच्या सवयीला बदलायला सांगत असतील तर नक्कीच आपण त्याचा विचार केला पाहिजे. कारण याने आपल्या आरोग्य बिघडण्याची शक्यता असते.

अनेक धर्मांमध्ये उभे राहून पाणी पिणे याविषयी लिहण्यात आले आहे. इस्लाम धर्मीयांमध्ये एका हदीसमध्ये पैगंबर मुहम्मद यांनी सांगितले आहे की उभे राहून पाणी पिऊ नये. या संदर्भात दोन मते आहेत. काही लोक मानतात की उभे राहून पाणी पिणे इस्लाममध्ये हराम आहे. इस्लामनुसार पाणी किंवा काहीही प्यायचे असल्यास शांतपणे बसून प्यावे. मात्र, आब–ए–जमजमचे पाणी आणि वजूचे उरलेले पाणी उभे राहून पिणे योग्य मानले जाते. तसेच, पाणी नेहमी उजव्या हाताने प्यावे असे सांगितले आहे.

वैज्ञानिक म्हणतात कि उभे राहून पाणी प्यायल्याने तहान मिटत नाही. तसेच हानिकारक टॉक्सिक्स बाहेर निघण्यास अडथळा येतो. उभं राहून पाणी प्यायल्याने पाण्यातील पोषकतत्व शरीरातील इतर भागामध्ये पोहचत नाहीत. तसेच पाण्यातील व्हिटॅमिन्सही शरीराच्या सर्व भागात पोहचण्यास असक्षम ठरतात. पाणी उभे राहून प्यायल्याने शरीरात पाणी पिण्याची गती फार जलद असते. याचा हृदयावर परिणाम होण्याची शक्यता असते. तसेच हे फुफुसांसाठी ही घातक मानले जाते. त्यामुळे, वैद्यानिक बसून पाणी पिण्याचा सल्ला देतात.

# पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्या खा. सोनवणेंनी केंद्रीय क्रीडा मंत्र्यांची भेट घेत मांडला मुद्दा



केज/प्रतिनिधी स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत सलग तीन वर्षे राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंना थेट वर्ग एक पदी नियुक्ती देण्यात येत असे. परंतु मागील दहा वर्षात अशी नियुक्ती दिलेली नाही. यापुढे लाडली बहन म्हणून पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्यावी, अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी मनसुख मांडविया, केंद्रीय क्रीडा मंत्री व रक्षा खडसे, क्रीडा राज्यमंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया, आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांना भेटून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया, भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील सलग तीन वर्ष फुटबॉल खेळलेल्या महिला खेळाडू राज्यांचे व देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मोठ्या मेहनतीने खेळतात. या महिला खेळाडूंच्या योगदानाला मान्यता मिळावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी लाडली बहन खेळाडू म्हणून पावले उचलण्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने, सलग तीन वर्षे राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंच्या लाडली बहन म्हणून थेट भरतीसाठी धोरण तयार करावे. केंद्रीय किंवा राज्य सरकारमध्ये त्यांना वर्ग–१ च्या नोकऱ्या देऊन त्यांच्या मेहनतीला योग्य न्याय द्यावा, यामुळे त्यांच्या योगदानाचा सन्मान होईल. तसेच भविष्यात अधिकाधिक महिला खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी प्रेरणा मिळेल. यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, असेही म्हटले आहे. यावेळी राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी ही मागणी अतिशय चांगली असून आपण लवकरच याबाबत निर्णय घेवू, असे आश्वासन देखील दिले. एकट्या बीड जिल्ह्यात राष्ट्रीय पातळीवर सलग तीन वर्षे खेळलेल्या खेळाडूंची संख्या ५० च्या घरात आहे. खा. सोनवणे यांनी केलेल्या मागणीनुसार निर्णय झाल्यास देशातील लाडक्या बहिनींना याचा मोठा फायदा होणार आहे.

# थंडीच्या मोसमात 'बीटरुट' पिकाची करा लागवड; एका हंगामात होईल लाखोंची कमाई!



अनेकदा शेतकरी पारंपरिक भाजीपाल्यांची लागवड करून पैसे मिळवतात.पण या भाजीपाल्यात काही खास पिकांची लागवड केल्यास शेतकऱ्यांना कमी वेळेत जास्त पैसे मिळू शकतात. यात सर्वात महत्त्वाचा आणि खास भाजीपाला म्हणजे बीटरूट. गेल्या काही वर्षात बीटरूटची मागणी वेगाने वाढली आहे. सॅलेड, सरबत, कोशिंबीर, चटणी, रक्त वाढीसाठी याची चांगले मदत होते. बीटरूट खूप फायदेशीर ठरू शकते. बीटरूटच्या गुणांमुळे बाजारपेठेत मागणी चांगली राहते. भारतात पंजाब, कर्नाटक, तमिळनाडू, राजस्थान, पश्चिम बंगाल व महाराष्ट्र या राज्यांमध्ये या पिकाची लागवड केली जाते. बाजारात याची चांगले मागणी आहे.

बीटरूट हा पौष्टिकतेने समृद्ध असलेली मूळ भाजी आहे. यामध्ये कॅल्शियम, लोह, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, फॉलिक सिड, फायबर, मॅंगनीज आणि पोटॅशियम मुबलक प्रमाणात आढळते. बीटरूट ब्लड प्रेशर आणि वजन कमी करण्यासाठी तसेच पचनसंस्था सुरळीत चालू ठेवण्यासाठी खूप मदत करते. बीटरूटमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स कर्करोगासारख्या घातक आजारावर उपयुक्त आहेत. हृदयविकार, निमिया इत्यादी आजारांवरही हे फायदेशीर आहे. फायदे लक्षात घेता बीटरूटला बाजारपेठेत चांगली मागणी आहे, त्यामुळे शेतकरी त्याची लागवड करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात.

योग्य माती आणि हवामान

बीटरूट लागवडीसाठी सपाट आणि सुपीक वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम आहे. याशिवाय चिकणमाती जमिनीतही याची यशस्वी लागवड करता येते. परंतु मातीची पीएच पातळी ६ ते ७ च्या दरम्यान असावी. बीटरूट लागवडीसाठी थंड हवामान उत्तम मानले जाते. मात्र, उन्हाळी हंगामात किंवा पॉलिहाऊसमध्येही त्याची लागवड करता येते. जास्त तापमानामुळे मुळांमध्ये साखरेचे प्रमाण वाढते त्यामुळे कंद योग्य प्रकारे विकसित होत नाही.

असे तयार करा शेत

सर्वप्रथम शेताची खोल नांगरणी करावी. यानंतर तणांचे नियंत्रण करून शेतात शेणखत टाकून शेत तयार करावे. वाफ्या तयार करून आणि कड्यावर बीटरूट पेरल्यास पीक चांगले येते. बीटरूट बियाणे २ सेमी खोलीवर पेरले पाहिजे अशा पद्धतीने लागवड केल्यास चांगले परिणाम मिळतात.

सिंचन आणि तण नियंत्रण

साखर बीट पिकाला जास्त सिंचनाची गरज भासत नाही. साधारणपणे पहिले पाणी पेरणीनंतर १५ दिवसांनी आणि दुसरे पाणी पेरणीनंतर २० दिवसांनी द्यावे. यानंतर २० ते २५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. सिंचन करताना शेतकऱ्यांनी शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. तण नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी २५ ते ३० दिवसांनी खुरपणी करावी.

या गोष्टींकडे लक्ष द्या

बीटरूटच्या लागवडीसाठी, शेतात सतत ओलावा असणे आवश्यक आहे.

बीटरूटची लागवड थंड महिन्यात किंवा दमट भागात जास्त केली जाते.

थंड किंवा दमट भागात घेतलेल्या बीटरूट पिकांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते.

त्याच्या लागवडीसाठी जास्त पावसाची गरज नाही.

पावसाचा त्याच्या लागवडीवर परिणाम होत नाही.

ऑक्टोबर–नोव्हेंबर हे महिने लागवडीसाठी चांगले मानले जातात.

बीटरूट पिकासाठी २० अंश तापमान पुरेसे असते.

शेतीमध्ये एक हेक्टरमध्ये १४–१५ किलो बियाणे लागते.

पीक पेरणीसाठी, एका रोपापासून दुसऱ्या रोपापर्यंतचे अंतर सुमारे १५–२० सेंटीमीटर असावे.

# थंडीत दही खावे की नाही? चरक संहितेत आहे योग्य उत्तर, ९९ टक्के लोकांच्या चुकीमुळे हाडं होतात खिळखिळी





दही स्वादिष्ट असण्यासोबतच आरोग्यदायीदेखील आहे. दह्याचे नियमित सेवन केल्याने शरीर मजबूत होते आणि रोगांशी लढण्यास मदत होते. दह्यामध्ये कॅल्शियम, प्रोटीन, फॉस्फरस आणि व्हिटॅमिन बी १२ यासह सर्व आवश्यक पोषक घटक असतात. दह्याचे सेवन केल्याने पचनाच्या समस्या, हाडांची कमकुवतता, उच्च रक्तदाब, हृदयविकार, त्वचा रोग, रोगप्रतिकारशक्तीचा अभाव आणि लठ्ठपणा यासारख्या समस्यांपासून आराम मिळतो. बहुतेक लोक दह्याचा स्वभाव थंड मानतात आणि म्हणून हिवाळ्यात ते जास्त सेवन करू नका.

तुम्हालाही या प्रश्नाचे उत्तर हवे असेल तर हिवाळ्यात आपण दही खाऊ शकतो का? तर भारतातील प्रसिद्ध आहारतज्ज्ञ भावेश गुप्ता सांगत आहेत हिवाळ्यात दही खावे की नाही?

आयुर्वेदात दह्याबाबत काय सांगतात

भावेश यांनी आपल्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, त्यामध्ये त्याने सांगितले की, सर्व आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये दह्याचे स्वरूप उष्ण असते असे सांगितले आहे, त्यामुळे हिवाळ्यात दही खाल्ल्यास अधिक फायदे मिळू शकतात. अनेकांना दही खाल्ल्याने सर्दी – खोकला होण्याची भीती वाटते मात्र असे अजिबात नाही.

दह्यात आहे प्रोबायोटिक

भावेश यांनी सांगितले की दही एक प्रोबायोटिक अन्न आहे जे तुम्हाला निरोगी बॅक्टेरिया देऊ शकते आणि त्याशिवाय ते कॅल्शियम आणि व्हिटॅमिन बी १२ चा चांगला स्रोत आहे, जे शरीराचे स्नायू आणि हाडे मजबूत करण्यासाठी आवश्यक आहे. दही नियमित खाणे आरोग्यासाठी योग्य ठरते.

याशिवाय दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स (चांगले बॅक्टेरिया) पचनसंस्था निरोगी ठेवतात आणि बद्धकोष्ठता आणि गॅस सारख्या समस्या कमी करतात. दह्यामध्ये असलेले चांगले बॅक्टेरिया रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि संसर्गापासून संरक्षण करतात.

हिवाळ्यात नेमकं दही खाण्याची योग्य वेळ कोणती? जाणून घ्या

हाडं आणि दातांसाठी योग्य

दह्यामध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी भरपूर प्रमाणात असते, जे हाडे मजबूत करण्यास आणि ऑस्टियोपोरोसिसपासून संरक्षण करण्यास मदत करते. नियमितपणे दही खाल्ल्याने कोलेस्टेरॉलची पातळी आणि उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत होते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

वजन कमी करण्यासाठी

दह्यामध्ये प्रोटीन आणि कमी कॅलरीज असतात, जो वजन कमी करण्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. हे भूक नियंत्रित करते आणि तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते. दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स मानसिक आरोग्य सुधारतात. तणाव आणि चिंता कमी करण्यासाठी हे उपयुक्त आहे. यामुळेच आयुर्वेदातही दह्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दही नियमित खाण्याचा सल्ला दिला जातो.

दही खाण्याची योग्य पद्धत

तुम्ही दही गूळ किंवा मधासोबत खाऊ शकता, ज्यामुळे शरीराला उर्जा मिळते

रायता किंवा लस्सी ऐवजी घट्ट दही सेवन करणे चांगले

थंड दही खाणे टाळावे. दही खोलीच्या तापमानावर आणल्यानंतर खा किंवा थोडे कोमट खा

ज्यांना दमा, सायनस किंवा वारंवार घशाचा त्रास होत असेल त्यांनी हिवाळ्यात दही खाणे टाळावे

## संकष्टी चतुर्थीच्या उपवासात सकाळच्या नाश्त्यासाठी बनवा कुरकुरीत उपवासाची भजी, वाचा सोपी रेसिपी

संकष्टी चतुर्थीला सर्वच महिला आणि पुरुष उपवास करतात. उपवासाच्या दिवशी घरात नाश्त्यासाठी साबुदाणा खिचडी, बटाट्याची भाजी, वरीचा भात इत्यादी पदार्थ बनवले जातात. पण या पदार्थांच्या सेवनामुळे पित्ताचा किंवा अपचनाचा त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे उपवासाच्या दिवशी पचनास हलके असलेल्या पदार्थांचे सेवन करावे. यामुळे पोटही भरते आणि आरोग्यसुद्धा फायदे होतात. सतत तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा निर्माण होते, अशावेळी तुम्ही सकाळच्या नाश्त्यात किंवा दुपारच्या वेळी उपवासाची भजी बनवू शकता. उपवासाची भजी चवीला अतिशय सुंदर लागते. थंडी वाढल्यानंतर सगळ्यांचं काहींना काही गरम पदार्थ खाण्याची इच्छा होते. अशावेळी बाहेरून विकत आणलेले पदार्थ खाण्यापेक्षा घरी बनवलेले पदार्थ खावेत. चला तर जाणून घेऊया उपवासाची भजी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

उकडलेला बटाटा

मीठ

हिरवी मिरची

काळीमिरी पावडर

पाणी

तेल

साबुदाणा पावडर

कृती:

उपवासाची भजी बनवण्यासाठी सर्वप्रथम, उकडवून थंड करून घेतलेले बटाट्यांची साल काढून व्यवस्थित मॅश करून घ्या.

त्यानंतर साबुदाणा पावडर, बारीक चिरून घेतलेली हिरवी मिरची, चवीनुसार मीठ टाकून मिक्स करून घ्या.

# थंडीत खाण्यासाठी हेल्दी आणि टेस्टी पदार्थ शोधताय? मग 'या' पद्धतीने बनवा गूळ राजगिऱ्याची चिक्की

थंडीच्या दिवसांमध्ये शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होत जाते. कारण या दिवसांमध्ये साथीच्या आजारांची मोठ्या प्रमाणावर लागण होते. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये शक्यतो गरम पदार्थांचे सेवन करावे. थंडी चालू झाल्यानंतर अनेक घरांमध्ये वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. वेगवेगळ्या प्रकारचे लाडू, चिक्की आणि इतर पदार्थ बनवले जातात. थंड वातावरणामुळे सतत काहींना काही खाण्याची इच्छा निर्माण होते. नेहमी नेहमी बाहेरचे पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर घरी बनवलेले पौष्टिक आणि हेल्दी पदार्थ खाण्याची इच्छा होते. अशावेळी तुम्ही गुळाची चिक्की बनवू शकता. गुळाची चिक्की आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. शिवाय थंडीत अनेक घरांमध्ये राजगिऱ्यापासून वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. राजगिऱ्यामध्ये प्रथिने, फायबर आणि इतर आवश्यक पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळून येतात. आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये राजगिऱ्याची चिक्की बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

साहित्य:

राजगिरा

गूळ

तूप

वेलची पावडर

कृती:

राजगिऱ्याचे लाडू बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढई गरम करून त्यात राजगिरा टाकून मंद आचेवर भाजून घ्या. गॅसची फ्लेम जास्त फास्ट ठेवू नये.

राजगिरा भाजून व्यवस्थित फुलल्यानंतर गॅस बंद करून ताटात राजगिरा काढून घ्या.

कढईमध्ये तूप टाकून त्यात गूळ टाका. गूळ वितळण्यास सुरुवात झाल्यानंतर चमच्याने सतत मिक्स करा.

गूळ पूर्णपणे वितळल्यानंतर त्यात वेलची पावडर टाकून मिक्स करून घ्या. नंतर त्यात भाजून घेतलेला राजगिरा टाकून व्यवस्थित गूळ आणि राजगिरा मिक्स करा.

ताटाच्या उलट्या बाजूला तूप लावून घ्या. त्यानंतर तयार करून घेतलेले चिक्कीचे मिश्रण व्यवस्थित पसरवून ५ मिनिटं तसेच ठेवा.

त्यानंतर सुरीच्या सहाय्याने तुम्हाला हवे त्या आकाराचे तुकडे करून चिक्की तयार करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली राजगिऱ्याची चिक्की.

राजगिरा खाण्याचे फायदे:





थंडीच्या दिवसांमध्ये राजगिऱ्याचे मोठ्या प्रमाणावर सेवन केले जाते. यामध्ये मॅग्नेशिअम, फॉस्फरस, पोटॅशिअम, कॅल्शियम, आयर्न मुबलक प्रमाणात आढळून येते. शिवाय राजगिरा हाडांच्या निरोगी आरोग्यासाठी अतिशय उत्तम आहे. राजगिरा खाल्यामुळे हाडं मजबूत राहतात. केसांच्या मजबूत वाढीसाठी आहारात राजगिऱ्याचे सेवन करावे. वजन कमी करण्यासाठीसुद्धा तुम्ही आहारात राजगिऱ्याचे सेवन करू शकता. कारण यामध्ये कमी फॅट असतात. शरीरात वाढलेले खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी राजगिरा प्रभावी आहे.

# जुईनगर येथे मार्गशीर्ष पौर्णिमा व वर्षावास सांगता समारोह उत्साहात संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :- आम्रपाली महिला मंडळ, प्रबुद्ध सेवा संघ उत्सव समिती आयोजित मार्गशीर्ष पौर्णिमा व वर्षावास सांगता सोहळा शनिवार दिनांक: १४.१२.२०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, जुईनगर येथे पार पडला. सदर कार्यक्रमास प्रमुख वक्ते आंबेडकरी विचारवंत व बुद्ध धम्माचे गाढे अभ्यासक आयु. राजेश कांबळे हे उपस्थित होते. त्यांचे स्वागत आम्रपाली महिला मंडळाच्या अध्यक्षा आयुनी. भारती भोळे यांनी केले. प्रमुख वक्ते आयु. राजेश कांबळे यांनी बाबासाहेबांना बुद्ध धम्म कसा अपेक्षित होता व बुद्ध लेण्यांमधील प्रतिमेचे हिंदु मंदिरात कसे बदल केले गेले, ह्यांची मुद्देसूद माहिती दिली. बाबासाहेबांनी केलेल्या क्रांतीला जगात तोड नाही आणि म्हणून सध्यप्रस्थीत बौद्ध आंबेडकरी समाज बांधवांनी बाबासाहेबांना अपेक्षित असणारी क्रांती करण्यासाठी सदैव जागृत आसले पाहीजे त्यांच्या ग्रंथाचे वाचन करून तो इतिहास आपन जिवंत ठेवला पाहीजे आसेही म्हणाले तसेच सदर कार्यक्रमास सहयोग चॅरिटेबल ट्रस्ट सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी असे आवाहन केले की, जुन्या वस्तु, साहित्य आम्ही जमा करून आदिवासी बांधवांना त्याचे वाटप करतो. आपणही हया कार्यास दर पौर्णिमेला ह्या वास्तू मध्ये आदिवासी बांधवांना मदत म्हणुन घरातील जून्या वस्तू जमा कराव्यात. जमा केलेल्या वस्तू आदिवासी बांधवांना पोहोचवण्याचं कार्य ते करतील. सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी आयु. ओम भोईर यांचे मंडळाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आम्रपाली महिला मंडळाच्या उपाध्यक्षा आयुनी. साधना जाधव यांनी केले या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आम्रपाली महिला मंडळाच्या सचिव आयुनी. शोभा भद्रिगे यांनी केले सदर कार्यक्रमात खीरदान आयु. आनंद जाधव परिवाराकडून करण्यात आले. आम्रपाली महिला मंडळाकडून अल्पोहार देण्यात आला. सरतेशेवटी, सरणत्तय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमास मोठ्या संख्येने धम्म उपासक – उपासिका व भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक व बौद्धाचार्य उपस्थित होते सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.





# नवीन वर्षात महागाईमुळे केसाबरोबर खिशाला लागणार कात्री



मुंबई : येत्या नवीन वर्षाला वाढत्या महागाईचा फटका बसणार असून सुरुवातीलाच सलून दरामध्ये २० ते ३० टक्के भाववाढ होणार आहे. सलून ब्युटीपार्लर असोसिएशन महाराष्ट्र राज्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. दत्तात्रय चव्हाण, महाराष्ट्र अध्यक्ष श्री. प्रसाद चव्हाण , मुंबई अध्यक्ष श्री.तुषार चव्हाण , महाराष्ट्र प्रभारी श्री. उदय टक्के यांनी भाववाढीचा निर्णय जाहीर केला आहे.

नव्या दरवाढीनुसार, शहरी भागासाठी केशकर्तनासह दाढीसाठी व इतर सौंदर्य प्रसाधन कामासाठी २० ते ३० टक्के ज्यादा पैसे मोजावे लागणार आहेत तर ग्रामीण भागासाठी हिच दरवाढ १५ ते २० टक्के असेल. नवीन दरवाढ लक्षात घेऊन ग्राहकांनीही सहकार्य करावे असे आवाहन सलून ब्युटी पार्लर असोसिएशन महाराष्ट्र राज्य तर्फे करण्यात आले आहे.

कोरोना काळात मागील तीन वर्षात सलून व्यवसायिकांनी कोणतेही दर वाड केली नाही त्यात कच्चा माल, वीज, पाणी आणि कामगारांच्या पगारात वाढ झाल्यामुळे नाईलाजाने सलून दरात वाढ करावी लागली. तसेच जीएसटी दरात देखील उल्लेखनीय वाढ झाली आहे. त्यामुळे मागील तीन वर्षांपासून स्थिर असलेले सलूनचे दर १ जानेवारी २०२५ पासून वाढविण्यात येणार आहेत. असे सलून ब्युटीपार्लर असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष बंधू चव्हाण यांनी सांगितले.

# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी, कार्यक्रम समन्वयक यांना प्रशिक्षण

लातूर : जिल्हा परिषद येथे जिल्हा क्षयरोग कार्यालय, सार्वजनिक आरोग्य विभागमार्फत वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, कार्यक्रम समन्वयक यांचे प्रशिक्षण झाले. यावेळी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मोहीमच्या प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक निक्षय शपथ घेण्यात आली.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तडवी ए.जे., उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) वंदना फुटाणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रदीप ढेले, आरएमओ डॉ.सारडा, अति.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बालाजी बरुरे, लातूर महानगरपालिकेचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.रमेश बगडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस. एन., वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अलका बांगर, जागतिक आरोग्य संघटनेचे सल्लागार डॉ.सम्यक खैरे, तसेच सर्व वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी, उपस्थित होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी उपस्थित सर्व वैद्यकीय अधीक्षक, तालुका अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांना १०० दिवस क्षयरोग मोहिमेच्या संदर्भात टीबीचा प्रादुर्भाव दर कमी करण्यासाठी प्रभावी काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले. जनजागृती, निक्षय पोषण आहार, क्षयरुग्णाना लवकरात लवकर शोधून त्याला संपूर्ण कालावधीत मोफत औषधोपचार देणे, तसेच व्यापक प्रमाणात लोकसहभाग घेण्याच्या सूचना दिल्या. १०० दिवस मोहिमेसाठी आयोजित प्रशिक्षणामध्ये संपूर्ण मोहिमेची सखोल माहिती, अहवाल, कर्तव्य आणि जबाबदारी, साय-टीबी तपासणी, क्षयरोग प्रतिबंध उपचार आदीविषयी डॉ.सम्यक खैरे व डॉ. तांबारे यांनी मार्गदर्शन केले.






# वंचित च्या वतीने पोलीस आयुक्त आणि नेरूळ पोलीस ठाणे यांना दिले निवेदन

नवी मुंबई / के. एच. हनवते :- वंचित बहुजन आघाडी बेलापूर तालुका आणि नवी मुंबई महिला यांच्या वतीने परभणी येथे झालेल्या घटना संदर्भात जाहीर निषेध व्यक्त करण्यात अला, गेल्या १० डिसेंबर २०२४ रोजी परभणी येथे काही जातीवादी समाज कंटकाकडुन संविधान शिल्पकृती ची विटंबना केली आणि त्या आंदोलनात दिनांक : १६ डिसेंबर २०२४ रोजी परभणी येथे झालेल्या संविधानाची विटंबना आणि संविधान प्रेमी सोमनाथ सुर्यवंशी या भिम सैनिकाची पोलिसांच्या मारहाणी मुळे मृत्युमुखी पावला हे प्रकरण गांभीर्याने घेऊन महाराष्ट्र बंद मधे सामील होऊन वंचित बहुजन अघाडी बेलापूर तालुक्याच्या वतीने, पोलीस आयुक्त कार्यालय नवी मुंबई आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेरूळ पोलीस ठाणे यांना जाहीर निषेध निवेदन देऊन मागणी केली की, जातीवादी आरोपी सह या आंदोलनाचा मास्टर माईंड कोण ? आहे याची सखोल चौकशी करून त्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल..! यावेळी बेलापूर तालुकाध्यक्ष : सुनील भोले, (महासचिव) गौतम चव्हाण, (उपाध्यक्ष) कल्याणराव हनवते, (सह सचिव) विजय सोनवणे, (उपाध्यक्ष) राजेंद्र गायकवाड, (संघटक) संजय केदारे, नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदिवे, (महीला आघाडी महासचिव) साक्षीताई लोटे, ज्योतीताई उबाळे, (ऐरोली तालुकाध्यक्ष) दिपक पहुरकर, दत्तात्रेय कांबळे ईत्यादी नवी मुंबईतील वंचित पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.





# १६ डिसेंबर चे गांभीर्य लक्षात घेऊन बडेजाव न करता वाढदिवस साजरा

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक : १६ डिसेंबर २०२४ रोजी रिपब्लिकन सेना (सरसेनानी) आनंदराज आंबेडकर यांनी परभणी येथील घडलेल्या घटनेत आपलाच एक भिम सैनिक पोलीस मारहाणीत जेल मधेच मृत्युमुखी पावला आणि म्हणून त्या संदर्भात आपले नेते आनंदराज आंबेडकर यांनी संपूर्ण महाराष्ट्र बंद चे अव्हाण केले होते, त्यात आपला वाढदिवस साजरा करणे मला योग्य वाटत नसल्याने रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष, समाजसेवक : वीरेंद्र लगाडे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त कुठल्याही प्रकारचा बडे जाव न करता आगदी साद्या पध्दतीने, सेक्टर -१६ नेरूळ नवी मुंबई येथील अनाथ आश्रमामध्ये जाऊन आपल्या कुटुंबीयांसोबत अनाथ मुलांबरोबर वाढदिवस साजरा केला व त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.




# परभणीणी येथील संविधान विटंबना प्रकरणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे केज तहसील यांना निवेदन

केज/प्रतिनिधी दिवसेंदिवस दलितांच्या अन्याय अत्याचारात सातत्याने वाढ होत असून जातीयवाद्याकडुन मुद्दामहून टार्गेट केले जात आहे. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे परभणी येथील घटना साक्ष देत आहे. दलित बांधवा कडुन लोकशाही मार्गाने केलेले आंदोलन पोलिस प्रशासनाने चिरडून दलित समाजाच्या तरुणांना आणि महिलांना घरात घुसून बेदम मारहाण करून त्यांना पोलिस कोठडीत आणि न्यायालयीन कोठडीत टाकले असता त्यातील दलित बांधवांचा झालेला संशयास्पद मृत्यू यामुळे सर्व महाराष्ट्रात तिव्र पडसाद उमटले आहेत. त्यामुळे केज येथेही दलित संघटना रस्त्यावर उतरल्या असुन मयत सोमनाथ सुर्यवंशी याला न्याय मिळाला पाहिजे या साठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) गटाच्या वतीने काल केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.या बाबत अधिक माहिती अशी की परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असणाऱ्या संविधानाच्या प्रतिकृतीची एका जातीयवादी माथेफिरूने दि. १० डिसेंबर २०२४ रोजी फोडून तोंडुन विटंबना केली होती. त्यामुळे येथील दलित बांधवांच्या भावनेचा उद्रेक झाला होता. त्यातच त्यांनी शहरातुन लोकशाही मार्गाने निषेध मोर्चाचे आयोजन केले होते. परंतु काही जातीयवाद्यांनी या अंदोलनामध्ये सहभागी होवुन या आंदोलनाला हिंसक वळण दिले. आणि त्यानंतर पोलिसांनी बौध्द समाजाच्या वस्त्यांमध्ये जाऊन स्वतः वाहनांची आणि गाड्यांची तोडफोड केली. त्यांचे व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाले आहेत. आणि दलित बांधवांनी हि तोडफोड केल्याचे त्यांचेवर आरोप करुन त्यांना घरात घुसून महिला, मुले , आजारी व्यक्ती यांना जबर मारहाण करून त्यांना फरफटत ओढत नेहुन पोलिस कोठडीत आणि न्यायालयीन कोठडीत डांबुन तेथेही जबर मारहाण करण्यात आली. यावेळी न्यायालयीन कोठडीत असणारा सोमनाथ सुर्यवंशी याला देखील जबर मारहाण केल्याने त्याचा या न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व बौद्ध समाजामध्ये प्रचंड चिड निर्माण झाली असून बौध्द आंदोलक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांची सीआयडी मार्फत चौकशी करण्यात यावी. तसेच संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या ज्याच्यामुळे हे सर्व कांड झाले. त्या आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी.अशी मागणी समाजातुन होत आहे.या निषेधार्थ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (ए) गटाच्या वतीने व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ऍड.मा. दीपकभाऊ निकाळजे यांच्या आदेशानुसार आणि मराठवाडा कार्याध्यक्ष भगवंत वायबसे यांच्या सुचनेनुसार काल दि.१६ डिसेंबर २०२४ सोमवार रोजी केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. तसेच केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या सर्व मारेकरी आरोपीस तात्काळ अटक करुन त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी देखील या निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी पक्षाचे केज तालुकाध्यक्ष महादेव खरात मराठवाडा महिला अध्यक्षा आम्रपाली गजेशिव बिड जिल्हा संपर्क प्रमुख सुनिताताई कांबळे, बुद्धीराज आरकडे, ता.उपाध्यक्ष आकाश आदमाने, प्रवक्ता विष्णू गव्हाणे, तालुका कार्याध्यक्ष प्रकाश सत्वधर, शिल्पाताई बचुटे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE